<u>**फिर्यादी व्यंकटेश सुधाकर जोशी यांचा पुढील सरतपास विधीज्ञ श्री.ए.व्ही. राशिनकर यांचे मार्फत शपथेवर सुरु**</u> –

०६. प्रस्तुत प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकुर माझे सांगणेप्रमाणे लिहीण्यात आला. त्यावर मी वाचुन सही केली. त्यातील मजकुर बरोबर आहे.

०२. आता मला यादी क्र.३/१ वरिल ठराव दाखविला. त्यावर प्राधिकृत अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२८** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/२ वरिल धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.२९** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/३ वरिल रिटर्न मेमो दाखविला. त्यावर बँकेची सही व शिक्का आहे. ती मी ओळखतो. त्याला **नि.३०** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/४ वरिल नोटीसची स्थळप्रत दाखविली. त्यावर माझे विधीज्ञांची सही आहे. त्यास **नि.३१** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/५ वरिल पोस्टाची आर.एल. पावती दाखविली. ती तिच आहे. त्यास **नि.३२** देण्यात आली. फिर्यादी व फिर्यादीचे विधीज्ञांसमोर नोटीसचे पाकीट उघडण्यात आले. आता मला यादी क्र.३/६ वरिल पोस्टाचे पाकीट दाखविले. त्यास **नि.३३** देण्यात आली. पाकीटातील मुळ नोटीस आता मला दाखविली. त्यावर माझे विधीज्ञांची सही आहे. त्यास **नि.३४** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/७ वरिल खातेउतारा व भारतीय साक्ष अधिनियम चे कलम ६३ प्रमाणे प्रमाणपत्र दाखविले. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **नि.३५** देण्यात आली. आता मला यादी क्र.२७/१ वरिल कर्ज मागणी अर्ज दाखविला. त्यास **नि.३६** देण्यात आली. आता मला यादी क्र.२७/२वरिल कर्ज रोखा दाखविण्यात आला. त्यास **नि.३७** देण्यात आली. आता मला यादी क्र.२७/३ वरिल वचनचिठ्ठी दाखविण्यात आली. त्यावर आरोपीच्या सही आहे. त्यास

**नि.३८** देण्यात आली.

सरतपास पुर्ण.

प्रकरण उलटतपासकरिता पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/–

(माधुरी आर.खानवे)

दिनांक २१/०१/२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०४, अहमदनगर